**विषय: मौ. पापलवाडी ता. माहूर व मौ. नावंद्याची वाडी ता. कंधार येथील परिसर अलर्ट झोन (Alert Zone) करणे बाबत.....**

जिल्हाधिकारी **कार्यालय, नांदेड**
**जा.क्र.२०२१/मशाका/आ.व्य./कावि -**
**दि. १४/०१/२०२१**

**वाचा:-** १) प्राण्यांमधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९
२) Action Plan for Prevention, Control and Containment of Avian Influenza (Revised 2021)

**आदेश:-**

ज्याअर्थी, माहूर तालुक्यातील मौ. पापलवाडी व कंधार तालुक्यातील नावंद्याची वाडी शिवारात अज्ञात आजाराने कोंबड्या दगावल्याचे आढळून आले असून मृत्यूचे कारण अद्यापपर्यंत स्पष्ट झाले नसल्याने व सबब कोंबड्यांना कोणते आजार झाले हे अनिष्कर्षीत (Inconclusive) असल्याने सबब रोगाचा प्रसार जिल्ह्यात इतर ठिकाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ (Prevention and Control of Infectious and Contagious Diseases in Animals Act, 2009) मधील तरतुदीनुसार मौ. पापलवाडी ता. माहूर व मौ. नावंद्याची वाडी ता. कंधार जिल्हा नांदेड येथे सर्वेक्षणाचे काम पूर्ण होईपर्यंत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यावश्यक झाले आहे.

त्याअर्थी, **मी, डॉ. विपिन इटनकर, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी नांदेड,** प्राण्यांमधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, २००९ (Prevention and Control of Infectious and Contagious Diseases in Animals Act, 2009) व Action Plan for Prevention, Control & Containment of Avian Influenza (Revised, 2021) मधील तरतुदींनुसार मौ. पापलवाडी ता. माहूर व मौ. नावंद्याची वाडी ता. कंधार जि. नांदेड येथील १० कि.मी. त्रिज्येतील (Within Radius of 10 KM) क्षेत्र "सतर्क भाग (Alert Zone)" म्हणून घोषित करून खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१. प्रभावित क्षेत्राच्या ठिकाणी वाहनांच्या ये–जा करण्यास मनाई करण्यात येत असून आणि त्या ठिकाणची खाजगी वाहने प्रभावित परिसराच्या बाहेर लावण्यात यावीत.

२. प्रभावित क्षेत्रात जिवंत व मृत कुक्कुट पक्षी, अंडी, कोंबडीखत, पक्षीखाद्य, अनुषंगिक साहित्य व उपकरणे ई. च्या वाहतूकीस मनाई करण्यात येत आहे.

३. प्रभावित पोल्ट्री फार्मच्या परिसरात नागरिकांच्या हालचालीस, तसेच इतर पक्षी आणि प्राण्यांच्या वाहतुकीस प्रतिबंध करण्यात येत आहे.

४. प्रभावित पोल्ट्री फार्मचे प्रवेशद्वार आणि परिसराचे २% सोडियम हायपोक्लोराइट किंवा ४% फ़ॉरमॅलीन (2% NaClO/ 4% $CH_2O$) निर्जंतुकीकरण करावे.

५. प्रभावित पोल्ट्री फार्ममध्ये पक्ष्यांसंबंधीच्या सर्व नोंदी व्यवस्थित ठेवण्याबाबत विशेष दक्षता घ्यावी.

६. प्रभावित क्षेत्राच्या परिसरात प्रभावित पक्ष्यांच्या आजारांचे निदान अहवाल (Test Results) प्राप्त होईपर्यंत कुक्कुट पक्ष्यांची खरेदी-विक्रीची दुकाने, वाहतूक, बाजार व यात्रा / प्रदर्शन इ. बाबी बंद राहतील.

७. या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त पुरविण्यात यावा.

सदरहू आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED DIST.

(डॉ. विपिन इटनकर) भा.प्र.से.
जिल्हाधिकारी नांदेड
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड.**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**

१) मा. सचिव, कृषी, पशुसंवर्धन व दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय मुंबई – ०३२

२) मा. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य औंध पुणे – ६७

३) मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद

**प्रतिलिपी, माहितीस्तव व कार्यवाहीस्तव**

१) पोलीस अधीक्षक, नांदेड

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नांदेड

३) प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, लातूर.

३) उपविभागीय अधिकारी (सर्व), नांदेड जिल्हा

4) तहसिलदार (सर्व), नांदेड जिल्हा

५. उपायुक्त, जिल्हा पशुसंवर्धन, नांदेड

६. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प. नांदेड

७. सर्व संबंधितास

८. आदेश संचिका

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE
NANDED Dist.

(डॉ. विपिन इटनकर) भा.प्र.से.

जिल्हाधिकारी नांदेड

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड.